Lilavati Hospital and Research Centre

*More than Healthcare, Human Care*

दैंनिक **लोकशाही** १९५५ पासून निर्भिडलिखाण करणारे व महिलेने चालविलेले स्वतंत्र दैंनिक

# स्पायना बिफीडाची समस्या आणि उपाय

*एखाद्या गर्भवती आईच्या गर्भात वाढणाऱ्या बाळाच्या बाबतीत अनेकदा या बाळाचा विकास होत असतानाच अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होतात आणि त्यामुळेच मग या बाळाची नऊ महिन्यानंतर पूर्ण वाढ झाल्यानंतर देखील काही विशिष्ट प्रकारचे आजार बळावतात . या समस्यांकडे दुर्लक्ष केल्यास बाळाच्या जीवास देखील धोका संभवतो . लहान बालकांच्या बाबतीत अलीकडच्या काळात दिसणारा एक गंभीर आजार म्हणजे स्पायना बिफीडा . आपल्या देशात जन्माच्या वेळी अनेक मुलांमध्ये स्पायना बिफीडा ची प्रकरण वाढताना दिसताहेत . या आजाराबाबत जनमानसात जागृती नसल्यानेच वेळेवर या आजराबाबतीत निदान आणि उपचार होत नाहीत . मुळात ,स्पायना बिफीडा हा आजार नेमका काय आहे ?या आजाराचे निदान कसे होते ?आणि या आजारावर उपचार उपलब्ध आहेत काय ?या संधर्भात मुंबईतील लीलावती हॉस्पिटलचे बालरोग सर्जन विभागाचे सल्लागार असलेले डॉ . संतोष करमरकर यांच्याशी केलेली बातचीत .*

## १ स्पायना बिफीडा हा आजार नेमका काय आहे ?

स्पायना बिफीडा या आजारात लहान बालकाच्या पाठीचा मणका आणि मेरुदंड व्यवस्थित विकसित होत नाही . त्यामुळे मुलाच्या विकासात अडचणी येतात . अनेकदा या आजाराबाबत लोकांना माहिती नसल्यामुळे आणि मुलांच्या पालकांची आर्थिक स्थिती बेताची असल्यामुळे या आजाराचे निदान आणि उपचार वेळेवर होत नाहीत . त्यामुळे भविष्यातील गुंतागुंत वाढते . हा अनुवांशिक स्वरूपाचा आजार नसून गर्भधारणेच्या सुरवातीला आईमध्ये फॉलिक ऍसिडची कमतरता निर्माण झाल्यामुळे मुलामध्ये हि समस्या उद्भवते . आणि वेळीच लक्ष न दिल्यास बाळास कायमचे अपंगत्व येऊ शकते .



**हेलों डॉक्टर**

## २ स्पायना बिफिडा या आजराचे निदान कसे करतात त्याची लक्षण काय आहेत ?

स्पायना बिफीडा हि एक अशी स्थिती आहे जी पाठीच्या कण्याला प्रभावित करते आणि सामान्यतः जन्माच्या वेळी या स्थितीचे निदान होते . हा एक प्रकारचा न्यूरल ट्यूब डिफेक्त आहे . गर्भधारणेदरम्यान किंवा बाळाच्या जन्मानंतर स्पायना बिफीडा या आजाराचे निदान केले जाऊ शकते . गर्भवती स्त्रियांना अशक्तपणा ,पायाचा अर्धांगवायू ,आकडी येणे ,पायांमधील विकृती ,असामान्य नितम्ब आणि मूत्राशयाच्या समस्या हि स्पायना बिफीनाची लक्षण आहेत .

## ३ स्पायना बिफीडा या आजाराचे किती प्रकार आहेत ?

स्पायना बिफीडा हा आजार ३ वेगवेगळ्या प्रकारात दिसून येतो . मायलोमेनिंगोसेल हा सर्वात गंभीर प्रकार आहे . यामध्ये मुलाच्या पाठीच्या माणक्यावरील पिशवीतील नसा खराब होतात आणि अपंगत्व येते . दुसऱ्या प्रकारच्या स्पायना बिफीडा मध्ये मुलाच्या पाठीच्या छिद्राच्या बाहेर द्रवपदार्थांची थैली समाविष्ट असते . या थैलीमध्ये पाठीच्या कण्याचा कोणताही भाग समाविष्ट नसतो . मज्जातंतूचे नुकसान झाल्याने किरकोळ अपंगत्व येते .



आणि ऑकल्टा हा स्पायना चा सर्वात सौम्य प्रकार असतो याचे निदान सहसा लहान पणी होत नाही . मात्र या प्रकारात अपंगतव येत नाही .

## ४ या आजारावर उपचार काय आहेत ?आणि या आजारा संधर्भात जनजागृती करिता आपण कोणत्या उपक्रमांचे आयोजण केले आहे ?

स्पायना बिफीडा हा आजार आईमध्ये फॉलिक असिडची कमतरता असल्यामुळे होतो .त्यामुळे फॉलिक असिड ची कमतरता भरून काढण्यासाठी गर्भवती मातेच्या आहारात सुमारे ४०० ग्राम टोमॅटो किंवा संत्र्याचा समावेश असायला हवा . शेवग्याच्या शेंगांमध्ये या ऍसिड चे प्रमाण नगण्य असते . परंतु शेवग्याच्या पानांची भाजी खाल्ली तर भरपूर प्रमाणत फॉलिक ऍसिड मिळू शकते . शिवाय मातेच्या आहारात अत्यावश्यक जीवनसत्व असलेल्या पौष्टिक पदार्थांचा देखील समावेश असावा . आपल्या देशात दरवर्षी ४०००० पेक्षा जास्त मूळ जन्मतः या आजारासह जन्मास येतात . या आजारा संधर्भात जनमानसात जागृती नाही . यासाठीच लीलावती रुग्णालयाच्या बालरोग शस्त्रक्रिया विभागाने स्पायना बिफीडा फाउंडेशनच्या सहकार्याने ३० जानेवारी रोजी मोफत शिबिराचे आयोचजण केले आहे . स्पायना बिफीडा बद्दल समाजात जनजागृती करणे हा या शिबिराचा उद्देश असून या शिबिरात रुग्ण शत्रक्रियेच्या शुल्कावर ५० ते १०० टके सवलत मिळवू शकतात .